जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ४३७ दिनांक - १७/०६/२०२३

### भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

# टोळी प्रमुख प्रेम अंकुश शिंदे व त्याचे इतर ०४ साथीदार यांचे विरुध्द मकोका कायद्यान्वये कारवाई

दिनांक २०/०५/२०२३ रोजी आंबेगाव बुाा, पुणे येथे फिर्यादी त्यांचा मुलगा हा सोसायटीच्या बिल्डींगच्या पार्किंग मध्ये नवले हॉस्पीटल, पुणे येथे जाण्याच्या तयारीत असताना आंबेगाव परिसरातील काही मुले ही दुचाकीवरुन येवुन फिर्यादी यांचा मुलगा याचे सोबत झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरुन त्यास जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचे हातातील धारदार हत्याराने फिर्यादी यांच्या मुलाच्या डोक्याच्या दिशेने वार केला असता तो याने तो वार चुकविल्याने त्यांनी फिर्यादी यांचा मुलगा यास मारहाण करण्याच्या उद्देशाने सर्वांनी सोबत आणलेल्या मोकळ्या बाटल्या यास फेकुन मारल्या तसेच फिर्यादी व त्यांची मुलगी हे भांडणे सोडविण्यासाठी मध्ये आले असता यांना वाईट-वाईट शिवीगाळ करुन फिर्यादी यांच्या गंचाडीला धरुन हाताने मारहाण करुन सोबत आणलेले हत्यार डोक्याला लावुन संपवुन टाकेन अशी धमकी दिली त्याबाबत फिर्यादी यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु.र.नं.३१७/२०२३,भा.द.वि.कलम ३०७,३२३,५०४,५०६,१४३,१४८,१४९,४२७ महा.पो.अधि.कलम ३७(१)(३) सह १३५,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) प्रमाणे दिनांक २१/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **१) प्रेम अंकुश शिंदे वय- २३ वर्षे (टोळी प्रमुख) रा. वेताळनगर ताटे पार्क सोसायटी शेजारील बिल्डिंग आंबेगाव बुाा पुणे मुळ रा. मु.पो. खरीव, ता. वेल्हा, जि. पुणे** व त्याचे टोळीचे सदस्य **२) गणेश बाबू ओव्हाळ उर्फ भावडया वय-२४ वर्षे रा. जय शिवाजी चौक, अनिल कोंढवे यांचे ऑफीस जवळ आंबेगाव बु. पुणे ३) भिमश्या सुरेश मुडावत /चव्हाण वय-१९ वर्षे,रा. अमित ब्लु फिल्ड, सोसायटीचे जवळ,रसना हाईट स्लॅट नं. ४०१, आंबेगाव, पुणे ४) करण रवि पटेकर वय २० वर्षे रा. भुमकर ब्रिज, बालाजी पार्क समोर,स्लॅट नंबर १०१, न-हे,पुणे यांना अटक करण्यात आली असून ते सद्या येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथे आहेत** यातील एक आरोपी अजुन फरारी आहे.

यातील टोळी प्रमुख याने त्याचे सह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नविन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन गुन्हे केलेले असुन त्यांनी अवैद्य मार्गाने आर्थिक फायदा मिळविण्याचे उददेशाने खुनाचा प्रयत्न, दंगा,बेकायदेशिर हत्यार जवळ बाळगणे, मारामारी, नुकसान करणे जनमानसात दहशत पसरविणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहेत. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन देखिल सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे बेकायदेशिरपणे आर्थिक फायदयाकरीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आलेने तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन. १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करणेकामी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय कुंभार यांनी मा.पो.उप-आयुक्त परि-२, पुणे शहर, श्रीमती स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. प्रविण पाटील यांना सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन वरील आरोपी यांना भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे ३१७/२०२३ भा.द. वि.कलम ३०७,३२३,५०४,५०६,१४३,१४८,१४९,४२७, महा.पो.अधि.कलम ३७(१)(३) सह १३५,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन.१९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२), ३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री प्रविण पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास स्वारगेट विभागाचे सहा.पोलीस आयुक्त श्री.नारायण शिरगांवकर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री. रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री. संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. प्रविण पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परि-२, पुणे शहर, श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर,श्री.नारायण शिरगांवकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कुंभार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विजय पुराणिक, निगराणी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव गायकवाड,स.पो.फौ. चंद्रकांत माने, पोलीस अंमलदार नरेंद्र महांगरे ,महेश बारवकर,विशाल वारुळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही २७ वी कारवाई आहे.**